<u>नियमित दिवाणी दावा क्र.</u> १६/२०१८
CNR NO. MHRG140024812016

## <u>निशाणी क्रमांक २० वरील आदेश</u>

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–

वादीने सदरचा दावा ठरावाकरीता सरस निरस वाटपाकरीता तुर्तातुर्त तसेच निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ५ हे दिनांक २९.१०.२०१८ रोजी सुमोटो हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. ५ यांना कैफियत दाखल करणेस ४३ दिवसांचा विलंब झाला आहे. परंतु सदरचा विंलब हा प्रतिवादी यांना आवश्यक माहिती न कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे झालेला आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ करुन अर्ज मंजूर करण्याची त्यांनी मागणी केली आहे.

३. सदर अर्जावर वादीने योग्य ते न्यायाचे हुकूम व्हावेत असे म्हणणे दिले आहे.

४. वादीने दावा ठरावाकरीता सरस निरस वाटपाकरीता तुर्तातुर्त तसेच निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. कायद्यानुसार कोणत्याही दाव्यामध्ये दावा मिळकतीशी संबंधीत सर्व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे असते. तसेच दाव्याचा गुणदोशावर निकाल करण्याकरीता सर्व पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे असते. कैफियत दाखल करणेस झालेल्या विलंबाचे कारण हे संयुक्तीक आहे. न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी क्र. ५ यांना त्यांची कैफियत दाखल करणेस झालेला ४३ दिवसांचा विलंब माफ करणे योग्य होईल. कारणे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. ५ चा अर्ज (नि.क्र. २०) मंजूर करणेत येत आहे. |
| २. | खर्चासंदर्भात कोणतेही आदेश नाही. |

उरण. (आर.बी.पोळ)

दिनांक: २७.११.२०२१ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उरण.